सन २०१८-१९ करीता इको टुरिझम (राज्य) (२४०६ २२९५) योजनेंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बोटनिकल गार्डन निर्माण करणे करीता निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८८/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३० मार्च २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.अंदाज-२०१५/प्र.क्र.३६/फ-११, दि.१६.०६.२०१५
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.साववि-२०१५/प्र.क्र.१३२ (भाग-१)/फ-११,दि.२६.०७.२०१८
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.निसप-२०१८/ प्र.क्र.३४७/ फ-९ दि.२७.०९.२०१८
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.९१ /१२७२/२०१८-१९, दि. १६.१०.२०१८
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१८/प्र.क्र.१३५/अर्थ-३, दि. ०५.१२.२०१८
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.९१ /१९४९/२०१८-१९, दि. २९.०१.२०१९
७. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/२०१९/कोषा प्रशा-५, दि. ३१.०१.२०१९
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३,दिनांक ०८ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

राज्य योजनेअंतर्गत सन २०१८-१९ करीता निसर्ग पर्यटन/वन पर्यटन स्थळाचा विकास (२४०६ २२९५) या लेखाशिर्षाखाली रू.१४००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत आहे. माहे नोव्हेंबर, २०१८ च्या अधिवेशनात रु. रु.९५४४.५१ लक्ष असा एकूण रु.१०९४४.५१ लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित आहे. आता आठमाही सुधारीत अंदाजानुसार रु.८७५५.६० लक्ष नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र.४ नुसार रु.९८०.०० लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन निर्माण करणे ही योजना वन/वनेत्तर क्षेत्रातील अस्तित्वात असलेला जैविक साठा जतन करणे, वन/वनेतर दुर्मिळ, अस्तित्व धोक्यात आलेल्या वनस्पती, प्राणी सुक्ष्मजीव इत्यादीचे कमी झालेले प्रमाण वाढविणेसाठी तसेच पुर्ववत करण्यासाठी उपाय योजना करणे, दुर्मिळ व धोकाग्रस्त प्राणी, वनस्पतींचे भविष्यातील पिढयांसाठी संरक्षण व संवर्धन करणे, जनसामान्यांना जैवविविधतेचे महत्व पटवून देण्यासाठी जनजागृती निर्माण करणे, निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण शिक्षण कार्यक्रम परिणामकारकरित्या करणे, स्थानिक लोकांसाठी रोजगार निर्मिती करणे या उद्देशाने प्रस्तावित करण्यात आली होती. सदर योजनेस दिनांक १६.०६.२०१५ रोजीच्या

मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता दिलेली असून, संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक २६.०७.२०१८ अन्वये चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावर बंगलोरच्या धर्तीवर विसापूर येथे बॉटनिकल गार्डन निर्मितीचा कालावधी सन २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. सदर बॉटनिकल गार्डनसाठी तयार केलेल्या सविस्तर आराखडयास व त्यामधील अंतर्भूत बाबींसाठी रु.१११.७६ कोटी एवढी आवश्यक तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

इको टुरिझम (राज्य) (२४०६ २२९५) योजनेअंतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बोटनिकल गार्डन निर्माण करणे करीता मंजूर आराखडयातील आता रु.५०००.०० लक्ष वित्त विभागाने निधी वितरणास सहमती दर्शविली आहे. तसेच सदर कामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भ क्र.६ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांनी विनंती केलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्तावातील कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.५ व ९ वरील शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच वित्त विभागाच्या संदर्भ क्र.५,७ व ८ येथील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बोटनिकल गार्डन निर्माण करणे करीता **संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या आराखडयातील प्रशासकीय मान्यता असलेल्या कामास सन २०१८-१९ करीता रु.५०००.०० लक्ष इतका निधी** राज्य योजनेअंतर्गत इको टुरिझम (राज्य) (२४०६ २२९५) या लेखाशिर्षा अंतर्गत **खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून** वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडयाप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना घ्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.
२. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
३. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.

४. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.

५. सदरहू विकासाची कामे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांची राहील.

७. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

८. सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१०. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८,२५.०१.२०१९, ३१.०१.२०१९ व ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

११. शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१२. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६ २२९५) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्र. ४९६/व्यय-१०, दिनांक ३०.०३.२०१९ अन्वये व वित्त विभागाच्या दिनांक ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३११५१५५३४६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.31 15:20:46 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर
५. उपवनसंरक्षक (प्रादेशिक), मध्य चांदा वनविभाग.
६. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)